क.२/नसचि/प्रशासक/ ०९ /२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८ डिसेंबर, २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०९/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरिता **मंगळवार दि.११/१२/२०२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मध्ये विविध ठिकाणी महापालिकेच्या ओपनस्पेसमध्ये ओपन जिम बसविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२४/११/२०२३ वे विषयपत्र.**

३. सन २०२२-२३ मधील महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधा विकासासाठी विशेष तरतुद योजने *अंतर्गत मंजूर १३ कामांच्या प्रस्तावातील काम क्रमांक ८, ७, ११ आणि १२ कामे रद्द करुन त्या ऐवजी* प्रस्तावात नमुद केलेल्या कामांना मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/१२/२०२३ वे विषयपत्र.**

४. सांगली स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या जागेवर होणाऱ्या महापालिकेचे व्यापारी संकुल व प्रसुतिगृह इमारतीमधील गाळे भाडेतत्वावर देणे, भाडे निश्चित करणे व याकामी नियुक्त करण्यात आलेली समिती रद्द करण्यास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२३ वे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४ दिनांक :- ११/१२/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०९ दि.११/१२/२०२३ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दुपारी ०३.३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
५.	श्री.सुशिलकुमार कैंबळे – लेखाधिकारी	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री. झगडे – स.स.प.र.	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री. विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी आस्थापना	१०.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक/कर निर्धारक,संकलक
११.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	१२.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी
१३.	श्री. सहदेव कावडे – सहा.आयुक्त प्र.स.क्र.०१	१४.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजि.वर्कशॉप,सांगली/जलवि
१५.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०२	१६.	श्री. मानसिंग पाटील – सहा.आयुक्त प्र.स.क्र.०३
१७.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०४	१८.	श्री.डॉ. रविंद्र ताटे – वैद्यकीय आरोग्याधिकारी
१९.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.	२०.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
२१.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता	२२.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
२३.	श्री. वैभव वाघमारे – नगररचना, सांगली.	२४.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
२५.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२६.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
२७.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीचे सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मध्ये विविध ठिकाणी महापालिकेच्या ओपनस्पेसमध्ये ओपन जिम बसविणेस मान्यता देणे.

प्रशासक प्रस्ताव कोणी दिला आहे?

शहर अभियंता माजी महापौर दिग्विजय सुर्यवंशी यांनी दिलेला आहे.

उद्यान अधिकक्षक प्रस्तावानुसार ओपन जिम आवश्यक आहे.

प्रशासक विषय मंजुर.

विषय क्र. ०३	सन २०२२-२३ मधील महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत मंजूर १३ कामांच्या प्रस्तावातील काम क्रमांक ८, ७, ११ आणि १२ कामे रद्द करुन त्या ऐवजी प्रस्तावात नमुद केलेल्या कामांना मान्यता देणे.
शहर अभियंता	रु.३ कोटी १५ लक्ष मधील १३ कामांपैकी ४ कामे बदलणेची आहेत. वर्क ऑर्डर दिलेली नाहीत. शासनाचे पत्र आहे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र.०४	सांगली स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या जागेवर होणाऱ्या महापालिकेचे व्यापारी संकुल व प्रसुतिगृह इमारतीमधील गाळे भाडेतत्वावर देणे, भाडे निश्चित करणे व याकामी नियुक्त करण्यात आलेली समिती रद्द करण्यास मान्यता देणे.
शहर अभियंता	याकामासाठी समिती गठित केलेली होती ती रद्द करणेची आहे व भाडे निश्चित करणेचा विषय आहे.
प्रशासक	समितीमध्ये नगरसेवकांची नावे होती व एक मजला विक्री करण्याचा ठराव होता आता प्रशासकीय राजवट असल्याने नगरसेवक नाहीत त्यामुळे समिती रद्द करावी व शासन नियुक्त समिती मार्फत भाडे निश्चित करावे. त्यानुसार ठरावामध्ये अंशत: बदल करुन समिती रद्द करावी व विक्री रद्द करुन भाड़े निश्चित करावे.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ११/१२/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३६ **दिनांक :- ११/१२/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२८/११/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२८ ते ठराव क्र. ३५ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा विशेष -

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३७ **दिनांक :- ११/१२/२०२३**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२४/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मध्ये (१) धनंजय हौसिंग सोसायटी (२) त्रिकोणी बाग (३) महावीर उद्यान (४) नाना-नानी पार्क (५) मोती चौक (६) मंगलमुर्ती कॉलनी (७) प्रगती कॉलनी येथील महापालिकेच्या ओपनस्पेसमध्ये ओपन जिम बसविणेसाठी लागणारे साहित्य जिल्हा क्रीडा अधिकार यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन संबंधित मक्तेदाराकडून देखभाल दुरुस्ती करणेच्या अटीवर बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

टेहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३८ **दिनांक :- ११/१२/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२२-२३ मधील महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत र.रु.३ कोटी १५ लाख मात्रच्या मंजूर १३ कामांच्या प्रस्तावातील संदर्भ क्र.३ मध्ये नमुद काम क्रमांक ८ र.रु.२० लक्ष व सदंर्भ क्र.४ मध्ये नमुद काम क्रमांक ७,११ व १२ र.रु.६५ लक्ष ही कामे रद्द करुन त्या ऐवजी खालील नमुद केलेली कामांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळुन निधी मंजुर होणेकामी सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम रुपये
१.	मनपा क्षेत्रातील सांगलीवाडी प्रभाग क्र.१३ अंतर्गत रस्ते करणे ही कामगिरी करणे.	२० लक्ष
२.	मिरज वॉर्ड क्र.७ अ मधील सुहास कांबळे घर ते शहा घरापर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२० लक्ष
३.	मिरज वॉर्ड क्र.७ अ मधील छत्रपती शिवाजी नगर शिंदे घर ते क्षीरसागर घर रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२० लक्ष
४.	मिरज वॉर्ड क्र.७ अ मधील मुतवल्ली घर ते शहा घर ते डॉ.इनामदार घरासमोरील T टाईप रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२५ लक्ष

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ३९ **दिनांक :- ११/१२/२०२३**

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मा.महासभा ठराव क्र.४० दि.१८/०९/२०२० अन्वये सांगली स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या जागेवर व्यापारी संकुल व प्रसुतिगृह इमारत बांधणेस मान्यता देण्यात आलेली होती. सदरचे व्यापरी संकुल व प्रसुतिगृह इमारत बांधकामासाठी महापालिकेचा निधी खर्च होऊ नये यासाठी सदर संकुलाच्या पहिल्या मजल्यावरील व्यापरी गाळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ मधील तरतुदीनुसार विक्री करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. तसेच सदर इमारत पाडण्यासाठी व नविन व्यापारी संकुल व प्रसुतिगृह बांधकाम करण्यासाठी संपुर्ण प्रक्रियेचा नियतकालीक आढावा घेण्यासाठी ८ सदस्यांची संनियंत्रण समिती गठित करण्यात आलेली होती.

उपरोक्त मा.महासभा ठराव क्र.४० दि.१८/०९/२०२० मध्ये अंशत: बदल करुन ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सदर संकुलाच्या पहिल्या मजल्यावरील व्यापारी गाळे विक्री न करता भाडेतत्वावर दिल्यास महापालिकेला कामयस्वरुपी उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल यासाठी सदरचे पहिल्या मजल्यावरील व्यापारी गाळे विक्री न करता भाडेतत्वार देण्यास व सदरचे भाडे निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार –ब , असाधारण क्रमांक ४१८ दि.०६/११/२०२३ अन्वये गठित करण्यात आलेल्या समिती मार्फत भाड्याची रक्कम निश्चित करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच इमारत पाडण्यासाठी व नवीन व्यापारी संकुल व प्रसुतिगृह बांधकाम करण्यासाठी गठित करण्यात आलेली आठ सदस्यीय संनियंत्रण समिती रद्द करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका